


## काय म्हणतयं? पॉलिटिक्स



# माढ्यात पुन्हा रणजितसिंहांना संधी मिळणार की धैर्यशील?



**अजित उंब्रजकर**

**लोकसभा निवडणूक एक वर्षावर आली आहे. गेल्या तीन टर्म पासून सातत्याने चर्चेत राहिलेल्या माढा मतदारसंघात यंदाही भाजपकडून उमेदवारासाठी मोठी चुरस लागणार आहे. या मतदारसंघात सलग तिन्ही टर्मला भाजप आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांनी आपापले उमेदवार बदललेले आहेत. यंदा २०२४ मध्ये मध्येही भाजप आणि राष्ट्रवादी उमेदवार बदलणार की गतवेळीच्या उमेदवारांना पसंती मिळणार याकडे संपूर्ण माढा मतदारसंघाचे लक्ष लागले आहे. मात्र एकेकाळी राष्ट्रवादीचा दबदबा असलेल्या या मतदारसंघात आता मात्र भाजपची ताकद वाढल्याची दिसून येत आहे. भाजपकडून या मतदारसंघात विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्याबरोबरच जिल्ह्याचे संघटन सचिव धैर्यशील मोहिते-पाटील यांचे नावही पुढे येत आहे.**

### मोहिते- पाटील आणि निंबाळकर प्लस आणि मायनस

दोघेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या जवळचे आहेत, निंबाळकर हे आक्रमक नेते म्हणून ओळखले जातात तर धैर्यशील मोहिते पाटील हे शांत स्वभावाचे आहेत. निंबाळकर यांचे सर्वपक्षीय नेत्यांबरोबर चांगले संबंध आहेत. याउलट मोहिते पाटील यांचे माळशिरसह विविध मतदारसंघात विरोधक मोठ्या प्रमाणात आहेत. धैर्यशील मोहिते पाटील यांचे संघटन कौशल्य उत्तम आहे हे त्यांनी वारंवार सिद्ध केले आहे. या उलट खासदार निंबाळकर यांच्याकडे संघटन कौशल्याचा सध्यातरी अभाव जाणवत आहे. मान आणि खटाव मतदारसंघात निंबाळकर यांचे प्राबल्य आहे तर उर्वरित मतदार संघात मोहिते पाटील यांची ताकद मोठ्या प्रमाणात आहे.

### मोहिते- पाटील यांना वगळून माढा जिंकणे सध्यातरी अशक्य

माढा मतदारसंघात चार विधानसभा मतदार संघ सोलापूर जिल्ह्यातील तर माण आणि फलटण हे दोन मतदारसंघ सातारा जिल्ह्यातील आहेत, माण आणि फलटणमध्ये निंबाळकर यांचे प्राबल्य आहे तर उर्वरित चार मतदारसंघात मोहिते पाटील यांची ताकद जास्त आहे. त्यामुळे यंदा उमेदवारी देताना मोहिते पाटील यांना विश्वासात घ्यावेच लागणार आहे. मोहिते पाटील यांना वगळून माढा जिंकणे सध्यातरी अशक्य आहे त्यामुळे भाजप या मतदारसंघात कोणाला उमेदवारी देणार याची उत्सुकता सर्वांना लागली आहे.

### रणजितसिंह यांना मंत्रीपद मिळाल्यास होणार अडचण

सध्या राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार कधीही होऊ शकतो या मंत्रिमंडळात सोलापूर जिल्ह्यातून आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील यांना संधी मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे असे झाल्यास माढा मतदारसंघातून धैर्यशील मोहिते पाटील यांना उमेदवारी मिळणे कठीण जाणार आहे. एकाच घरात दोन पदे हे भाजपच्या तत्वात बसणे अवघड आहे.

२००९ मध्ये मतदार संघाची पुनर्रचना झाल्यानंतर माढा मतदारसंघाची निर्मिती झाली. २००९ मध्ये राष्ट्रवादीकडून येथून स्वतः शरद पवार मैदानात उतरले तर त्यांच्या विरोधात भाजपकडून सुभाष देशमुख यांना उमेदवारी देण्यात आली. यात अपेक्षेप्रमाणे शरद पवार विजयी झाले. त्यानंतर २०१४ मध्ये राष्ट्रवादीने उमेदवार बदलून माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांना उमेदवारी दिली तर दुसरीकडे भाजपने हा मतदारसंघ स्वाभिमानी शेतकरी संघटनेला सोडून सदाभाऊ खोत यांना उमेदवारी दिली. यावेळीही ही जागा विजयदादा यांच्या रूपाने राष्ट्रवादीने स्वतःकडे ठेवली. गेल्या निवडणुकीत म्हणजे २०१९ मध्ये राष्ट्रवादीने संजयमामा शिंदे यांना उमेदवारी दिली तर भाजपकडून रणजितसिंह निंबाळकर यांना उमेदवारी देण्यात आली. यावेळी मात्र हा मतदारसंघ राष्ट्रवादीकडून खेचून भाजपने जिंकला. गेल्या पाच वर्षाचा इतिहास पाहता या मतदारसंघात आता भाजपची ताकद वाढल्याचे दिसून येत आहे. मोहिते पाटील हे भाजपमध्ये आहेत, या मतदारसंघात येणारा सांगोला विधानसभा मतदार संघात शिवसेनेचे आमदार शहाजीबापू पाटील आहेत. माळशिरसमध्ये राम सातपुते आमदार आहेत, माणमध्ये जयकुमार गोरे भाजपचे आमदार आहेत. याशिवाय आता आमदार बबनदादा शिंदेही भाजपच्या वाटेवर आहेत तसेच नारायण पाटील आणि रश्मी बागल यांचेही शिवसेनेबरोबर सख्खे वाढले आहे. हे दिग्गज नेते भाजप सेनेबरोबर असल्यामुळे यंदा या मतदारसंघात भाजपचे पारडे जड मानले जात आहे. दुसरीकडे राष्ट्रवादीकडे करमाळ्याचे आमदार संजयमामा शिंदे आणि फलटणचे आ. दीपक चव्हाण, विधान परिषदेचे आ. रामराजे निंबाळकर, उत्तम जानकर हे नेते आहेत. या नेत्यांच्या जोरावर दोन्ही पक्षाला एकमेकांविरुद्ध लढावे लागणार आहे.

भाजपकडून उमेदवाराचा विचार करता खासदार रणजितसिंह निंबाळकर हे पुन्हा एकदा प्रमुख दावेदार मानले जात आहेत. मात्र, भाजपचे जिल्हा संघटक धैर्यशील मोहिते पाटील यांचेही नाव या मतदारसंघातून पुढे येत आहे. वास्तविक पाहता निंबाळकर हे मोहिते पाटील यांच्या ताकदीवरच निवडून आले आहेत. मोहिते पाटील यांनी जाहीर करूनच निंबाळकर यांना माळशिरस तालुक्यातून लाखांचे मताधिक्य दिले होते. सुरुवातीला निंबाळकर आणि मोहिते पाटील यांचे सख्य होते मात्र अलीकडील काळात या दोघांमध्ये शीत युद्ध सुरू झालेले आहे. नीरा देवधर योजनेच्या निधीवरून या दोघांमध्ये श्रेयवादाची लढाई सुरू आहे. दुसरीकडे विजयदादांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या पंढरपूर फलटण रेल्वे मार्ग मंजूर झाला आहे. यासाठी रणजितसिंह मोहिते पाटील यांनी एकेकाळी आंदोलनही केले होते. मात्र आता याचे श्रेय खासदार निंबाळकर घेत आहेत. त्यामुळे मोहिते पाटील आणि निंबाळकर यांच्या समर्थकांमध्ये वाद प्रतिवाद सुरू आहेत. गेल्या वर्षी झालेल्या नगरपंचायतीच्या निवडणुकीमध्येही मोहिते पाटील आणि निंबाळकर यांच्यामधील बेबनाव सर्वांसमोर आला होता. सुरुवातीला या मतदारसंघात नवख्या असलेल्या निंबाळकरांनी आता हळूहळू आपली ताकद निर्माण करण्यास सुरुवात केली आहे. मात्र हे करताना त्यांनी मोहिते पाटील यांना वगळल्याचे दिसून येते.

अलीकडच्या काळात खासदार निंबाळकर हे नीरा-देवधर योजना, पंढरपूर फलटण रेल्वे मार्ग मंजूर झाल्याचे सांगत पुन्हा एकदा या मतदारसंघावर दावा करत आहेत तर दुसरीकडे धैर्यशील मोहिते पाटील यांनी अधिकृतपणे या मतदारसंघातून लढण्याची इच्छा व्यक्त केली नसली तरी त्यांच्या समर्थकांकडून मात्र मोहिते पाटील यांना संधी द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

या मतदारसंघातून मोदी लाट असतानाही विजयसिंह मोहिते पाटील निवडून आले होते. या मतदारसंघात मोहिते पाटलांची मोठी ताकद आहे शिवाय त्यांना मानणारे नेते कार्यकर्ते ही आहेत. दुसरीकडे रणजितसिंह मोहिते पाटील यांनीही आपल्या आमदारकीचा निधी माण आणि फलटण भागातच मोठ्या प्रमाणात दिला आहे. ही मोहिते- पाटील यांची पुढील रणनीती तर नाही ना अशी चर्चाही सुरू झाली आहे.

# परिचारकांना माढ्याची जबाबदारी देताच, शिंदे बंधूंना भाजपात घेण्याच्या हालचाली

**सूरज सरवदे**







**लोकसभा २०२४ च्या निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपने तयारी सुरू केली आहे. विधान परिषदेचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांना भाजपने माढा लोकसभा मतदार संघाचे प्रभारी पद दिले आहे. त्यानुसार प्रशांत परिचारक यांनी कामाला देखील सुरुवात केली आहे. आमदार बबनदादा शिंदे आणि संजयमामा शिंदे यांना भाजपच्या गळाला लावण्यासाठी प्रशांत परिचारक यांनी प्रयत्न सुरू केल्याचे दिसत आहे.**

प्रशांत परिचारक, संजयमामा शिंदे आणि बबनदादा शिंदे यांच्या अनेक वर्षांपासून सख्य आहे. मोहिते पाटील यांच्या ताब्यातील जिल्हा परिषदेत संजयमामा शिंदे यांना जिल्हा परिषदेचे अध्यक्ष करण्यात परिचारक यांची मोठी भूमिका होती. परिचारक आणि शिंदे यांनी मोहिते पाटील यांना शह देत जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपद खेचून आणले होते.

मागील लोकसभा निवडणुकीत मोहिते पाटील यांनी जाहीर सांगून १ लाखाचे मताधिक्य खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना दिले होते. मात्र मोहिते पाटील आणि निंबाळकर यांच्यात नगर पंचायत निवडणुकीवरून मतभेद निर्माण झाले आहेत. त्यांच्यातील मतभेद मिटण्याचे संकेत मिळत नसल्याने मोहिते पाटील यांच्या ताकदी एवढेच तुल्यबळ शिंदे बंधूंना भाजपात घेण्याची व्यूवरचना आखली असल्याचे बोलले जात आहे. त्यासाठीच प्रशांत परिचारक यांच्यावर माढा लोकसभा मतदारसंघाच्या प्रभारी पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

माढा लोकसभेसाठी रणजितसिंह मोहिते पाटील किंवा धैर्यशील मोहिते पाटील इच्छुक आहेत. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या जागी पक्षाने दिलेला उमेदवार निवडून आणण्यासाठी मोहिते पाटील यांनी जीवाचे रान करून खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना निवडून आणले होते, मात्र त्यानंतर सुरू झालेल्या पक्षांतर्गत कुरघोडीत मोहिते पाटील आणि निंबाळकर यांच्यातील दरी वाढत गेली आहे. खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर आणि आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्यातील सुप्त संघर्ष शांत करण्याची जबाबदारी देखील प्रशांत परिचारक यांना पार पाडावी लागणार आहे.

परवा झालेल्या एका कार्यक्रमात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आमदार बबनदादा शिंदे यांचा माझे जुने सहकारी असा उल्लेख केल्यानंतर पालकमंत्र्यांना मध्येच थांबवत माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी आता त्यांना नवे सहकारी करा, अशी टिपणी केल्यामुळे बबनदादा शिंदे यांना भाजपात घेण्याच्या हालचाली सुरू झाल्याचे बोलले जात आहे.

# जि.प. गटात फेरबदल होणार?

**संजय पाटील**




माळशिरस तालुक्यात अकलूज नगरपंचायत, नातेपुते व श्रीपूर - म्हाळुंग येथील असणाऱ्या ग्रामपंचायत रद्द झाल्यामुळे माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषद गटात फेरबदल झाले आहेत. महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर माळशिरस तालुक्यात लोकसंख्येनुसार अकरा जिल्हा परिषद गटच राहणार, हे निश्चित झाले होते.यामध्ये तांदुळवाडी व कन्हेर हा जिल्हा परिषद गट तयार केल्यामुळे तालुक्यात पूर्वीप्रमाणे अकराच जिल्हा परिषद गट तयार करण्यात आले आहेत. मात्र आता भाजप- सेनेचे सरकार आल्यामुळे हे ११ गट कायम राहणार की यात बदल होणार याची उत्सुकता लागली आहे.

पूर्वी एका जिल्हा परिषद गटासाठी ४२ हजार मतदान होते ते नंतर महाआघाडीने ३५ हजार मतदानावे गट तयार केले. यामध्ये पूर्वीचा नव्यानेच अस्तित्वात आलेला निमगाव गट रद्द झाला आहे. गतनिवडणुकीत नातेपुते हा गट मोहिते पाटील विरोधकांकडे होता तर हक्काचा मोहिते पाटील यांचा अकलूज गट रद्द झाला आहे. महाविकास आघाडीचे सरकार असताना जि.प. गट दहीगाव, फोंडशिरस, संग्रामनगर, यशवंतनगर, माळीनगर, बोरगाव, वेळापूर, मांडवे,कन्हेर, तांदुळवाडी, पिलीव असे अकरा जिल्हा परिषद गट करण्यात आले आहे. महाविकास आघाडीचे सरकार असताना केलेली जिल्हा परिषदेची गट रचना कायम राहणार की सध्याचे सरकार हे बदलणार हे अद्याप गुलदस्त्यातच आहे. महाविकास आघाडीचे सरकार असताना तालुक्यात अकरा जिल्हा परिषद गटाबरोबर व पंचायत समितीचे आरक्षण सुद्धा जाहीर करण्यात आले होते . पण सध्या ओबीसी आरक्षणाचा विषय न्यायालयात आहे. एक वर्ष होऊन गेले तरी अद्यापही जि. प. व पंचायत समितीच्या निवडणुका लागल्या नाहीत. त्या कधी होणार याची चर्चा कार्यकर्ते करत आहेत.

### एकत्र आले तरच पराभव शक्य

सध्या भाजपमध्ये मोहिते पाटील गट व जुना भाजपचा गट असे दोन गट आहेत. यामध्ये जागा वाटपात दोन्ही गटात मनोमिलन होणार की गटबाजी होणार हे आगामी काळात दिसून येणार आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस स्वबळावर लढणार की काँग्रेस, शिवसेना उध्दव ठाकरे गट, स्वाभिमानी शेतकरी संघटना हे एकत्र येणार यावरच लढतीचे चित्र अवलंबून असणार आहे. सर्व विरोधक एकत्र येऊन लढले तरच ते भाजपला म्हणजेच मोहिते पाटील गटाला आव्हान देऊ शकतात.

# राष्ट्रवादी व्यथित, भाजपा सुस्थितीत



**डी.एस.गायकवाड**

**सध्या कसबा पोटनिवडणुकीने महाविकास आघाडीची ताकद दुणावली असली तरी सोलापूर जिल्ह्यात मात्र राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चेने राष्ट्रवादी व्यथित दिसत आहे तर दुसरीकडे भाजपा मात्र जिल्ह्यात आणखी ताकदवान आणि बलवान होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.**

सोलापूर जिल्ह्याचे राजकारण नेहमी भाजपा राष्ट्रवादी या भोवती फिरताना दिसते. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांना मानणारा मोठा वर्ग असला तरी बदलत्या राजकीय परिस्थितीत आपल्या अस्तित्वाची नौका बुडू नये यासाठी सर्वच जण काळजी घेताना दिसत आहेत. सध्या महाराष्ट्रात राजकीय रणकंदन सुरू आहे. एकमेकांवरील टोकाच्या टीका -टिप्पणीमुळे राजकीय वातावरण ढवळून गेले आहे. पण सोलापूर जिल्ह्यातील नेते मंडळी मात्र अशा राज्यपातळीवरील वादात न पडता यावर अबोल राहणेच पसंद करताना दिसत आहेत. जिल्ह्याचे राजकारण एकीकडे झुकले की- ते एकिकडेच झुकते.

पूर्वी राष्ट्रवादीकडे जिल्ह्याने झुकते माप टाकले आता भाजपाकडे कौल असल्याचे चित्र आहे. त्यामुळे राष्ट्रवादीला कसरत करावी लागणार आहे तर भाजपाला असणाऱ्या ताकदीचा योग्य वेळी वापर करून विजयाच्या सिद्धीसाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.भाजपाची बांधणी बूथ स्तरावरून जोमदार होत असताना राष्ट्रवादी मात्र पक्ष बांधणीच्या बाबतीत अजूनही गाफील असल्याचे चित्र आहे.

### राजकीय कल निर्णायक

सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात नेहमीच मोहिते पाटलांचा राजकीय कल निर्णायक ठरत आलेला आहे. एकेकाळी ते राष्ट्रवादीत असताना संपूर्ण जिल्हा राष्ट्रवादीमय झालेला दिसत होता मात्र त्यांच्या भाजपा प्रवेशाने सध्या भाजपाचेच वातावरण सर्व स्तरात निर्माण होताना दिसत आहे. त्यामुळे इतरांची राजकीय गणिते चुकली तर ते मोहिते पाटील यांच्या दूरदृष्टीकोनातून केलेल्या राजकीय निर्णयाचा कल पाहतात आणि त्याकडे झुकू लागतात. हीच सध्याची परिस्थिती आहे.

### ....तर राष्ट्रवादी विकलांग होईल!

माजी आमदार राजन पाटील व आ. बबनदादा शिंदे यांच्याही भाजपा प्रवेशाच्या चर्चा गेल्या वर्षभरापासून झडताना दिसत आहेत. या दोन राष्ट्रवादीच्या मोठ्या नेत्यांनी जर राष्ट्रवादी सोडली तर राष्ट्रवादीची अवस्था सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय वातावरणात अतिशय विकलांग होणार आहे. पुन्हा जिल्ह्यात राष्ट्रवादीचा एकही आमदार निवडून येणार नाही, अशी परिस्थिती उद्भवू शकते.

# सोपल पुन्हा राष्ट्रवादीच्या वाटेवर?

**सचिन अपसिंगकर**

**सोपल यांनी आपल्या राजकीय वाटचालीमध्ये स्वत:ला सक्षम बनवले आहे. सोपल यांनी राष्ट्रवादीच्या माध्यमातून कॅबिनेट मंत्री पदही भुषवलेले आहे. सोपल यांच्या राजकीय नेतृत्वाची जिल्ह्यातील पवार समर्थकांशी नाळ जोडलेली आहे. त्यामुळे सोपल राष्ट्रवादीमध्ये लवकरच पुर्नरप्रस्तापित होवु शकतात. जिल्हाच्या राजकारणात राष्ट्रवादीअंतर्गत असलेल्या अजितदादांच्या गटाचे नेतृत्व अनेक वर्षे सोपलांकडे होते. राष्ट्रवादीच्या थिंक टँक आणि किचन कॅबिनेटमध्ये त्यांना मान होता. त्यामुळे सोपल यांना भविष्यातल्या राजकारणात आपल्या जुन्या गॉड फादरला बरोबर घेवुनच पुढे मार्गक्रमण करावे लागणार आहे. सोपल राजकीय उतावळेपणासाठी प्रसिध्द नाहीत. त्यांचा निर्णय ते अगदी आणीबाणीच्या क्षणी घेतात आणि अगोदर ते पाश्र्वभूमी तयार करतात हि त्यांची स्टाईल आहे. सध्या सोपल गटात वाहत असलेले राजकीय वारे लक्षात घेतले तर सोपल पुन्हा राष्ट्रवादीच्या वाटेवर आहेत असे म्हणता येईल.**



राज्याच्या राजकारणात सध्या मोठे चढ उतार होत आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे शिवसेना पक्षाची धुरा व धनुष्यबाण हे चिन्ह सोपवले आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात सध्या ठाकरे गट मोठ्या आव्हानात्मक परिस्थितीला सामोरे जात आहे. २०१९ साली विधानसभा निवडणूकीच्या तोंडावर तत्तकालीन राष्ट्रवादीचे आमदार व माजी मंत्री दिलीप सोपल यांनी शिवसेनेत प्रवेश केला होता. सोपल यांच्या राजकीय कारर्किदीमध्ये हा मोठा निर्णय होता. १९८० सालापासून सोपल यांनी कायम राष्ट्रीय नेते शरद पवार यांच्या नेतृत्वाची पाठराखण केली होती. शरद पवार यांनी घेतलेल्या प्रत्येक राजकीय निर्णयाच्या बरोबर रहात त्यांनी दोन वेळा अपक्ष आमदार म्हणून निवडणूक लढविली होती. सोपल यांना पवार यांचे सोलापूर जिल्ह्यातील निकटवर्तीय समर्थक म्हणून ओळखले जायचे. त्यातच अजितदादा पवार यांच्या बरोबरही त्यांचे घनिष्ठ संबंध असल्याचे मानले जायचे. मात्र एकंदरीत निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीमध्ये सोपल यांना विरोधकांची कोंढी करायची होती. त्यामुळे त्यांनी शिवसेनेत जायचा निर्णय घेतला.

मात्र त्यांची खेळी चुकली. सोपल यांना पराभवाचा फटका बसला. अर्थात सोपल यांचे व्यक्तिमत्व सर्वसमावेशक आहे. त्यामुळे २०१९ साली राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतरही सोपल यांच्या राष्ट्रवादीतील दृढ संबंधांची प्रचिती आली. सोपल यांच्याकडे राष्ट्रवादीतील राजेश टोपे, अनिल देशमुख, पालकमंत्री भरणे यांनी नेहमीच हजेरी लावली. सोपल यांनी अजितदादा पासून जयंत पाटील यांच्यापर्यत घेतलेल्या भेटी गाजल्या त्यांनतर राज्यामध्ये महाविकास आघाडी सरकारमध्ये सोपल यांच्या माध्यमातून बार्शीकरांची उटबस कायम राहिली.

त्यावेळेस अपक्ष आमदार राजाभाऊ राऊत यांनी भाजपा समर्थक होणे पसंत केले. नंतर सहा महिन्यापुर्वी राज्यातले महाविकास आघाडी सरकार पायउतार झाले. राज्यातल्या सत्तांतराचे पडसाद बार्शीच्या राजकारणावरही उमटले. आमदार राऊत हे भाजपाचा वरचष्मा असलेले सरकार सत्तेवर येताच अधिकच सक्रिय झाले. आमदार राऊत यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या बार्शीत जाहिर सभेचे आयोजन करून धडाका उडवून दिला. फडणवीस यांच्या हस्ते झालेल्या विकास कामांच्या उद्घाटनाचा मोठा गाजावाजा झाला. आता बार्शी तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका अगदी नजीक आहेत. सध्या ठाकरे गटाला राजकीय पुनरूज्जीवन करायचे आहे. मात्र चाणाक्ष सोपल तालुक्यात असलेल्या चुरशीच्या राजकीय स्पर्धेच्या वातावरणात ठाकरे गटात राहण्याचा धोका पत्कारतील असे वाटत नाही. सोपल शिंदे गटात जाण्याचेही शक्यता नाही. त्यामुळे सोपल आपले पुर्वाश्रमीचे राजकीय संबंध वापरून राष्ट्रवादीच्याच वाटेवर जाण्याची शक्यत आहे. सध्या आमदार राऊत यांनी फडणवीसांचा पर्याय निवडला आहे. त्यामुळे सोपल सुध्दा पवारांचा पर्याय निवडतील असा अंदाज आहे.